# Model Answer
## Set- II
**Std. – 10th MM/Semi**
**Subject – Geography**

MS-CIT आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

MKCL KLiC Courses — Gateway to Knowledge Lit Careers

**प्र.१ दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) ॲमेझॉनच्या खोऱ्यात सुमारे २००० मिमी पाऊस पडतो.
२) ब्राझीलमध्ये रस्त्याची घनता पूर्व भागात केंद्रित झालेली आहे.
३) अरवली पर्वताच्या पायथ्याशी मेवाड पठार आहे.
४) सावो पावलोचा सुपीक प्रदेश कॉफी च्या उत्पादनासाठी सुयोग्य आहे.

**प्र.२ योग्य जोड्या जुळवा.**


| | | |
|---|---|---|
| १) ब्राझीलमधील उच्चभूमी | - | लोकसंख्येची घनता माध्यम |
| २) सुपीक जमीन | - | लोकसंख्या दाट |
| ३) आसाम-दलदलीच्या प्रदेशात | - | एकशिंगी गेंडा |
| ४) वाळवंटी प्रदेश | - | रानटी गाढव |

**प्र.३ एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)**

१) आपल्या परिसरातील भौगोलिक घटकांना प्रत्यक्ष भेट देऊन त्याची माहिती मिळवणे यांस क्षेत्रभेट म्हणतात.
२) सावो पावलो आणि रिओ दी जनेरिओ पर्यटकांना आकर्षित करणारी ब्राझीलमधील दोन शहरे आहेत.
३) ब्राझीलमधील ॲमेझॉन नदीचा उगम अँडीज पर्वत रांगेच्या पूर्व उतारावर होतो.
४) ब्राझीलमधील सुरुवातीच्या वस्त्या युरोपमधून आलेल्या वसाहतवाद्यांनी निर्माण केल्या.
५) भारत आणि ब्राझील देश विकसनशील या प्रकारात मोडतात.

**प्र.४ अ) दिलेल्या ब्राझीलच्या नकाशा आरखड्यात पुढील घटक दाखवा. (कोणतेही चार)**

Brazil




Scanned with CamScanner

**आ) दिलेल्या आकृतीचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) भारताच्या पूर्वेला बांग्लादेश, म्यानमार हे देश आहेत.

२) भारतात एकूण २९ घटकराज्ये आहेत.

३) लक्षद्वीप (अरबी समुद्र), अंदमान-निकोबार (बंगालचा उपसागर) ही दोन भारताचा भाग असलेल्या द्वीपसमूहांची नावे आहेत.

४) नेपाळ, भूतान, चीन, अफगाणिस्तान हे देश भारताच्या उत्तरेला आहेत.

५) भारताच्या दक्षिणेला श्रीलंका आणि इंडोनेशिया हे देश आहेत.

६) भारताच्या मध्यातून कर्कवृत्त जाते.

**प्र.५ भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही दोन)**


१) १) उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात शेती व्यवसायाचा विकास झाला आहे. २) या मैदानी प्रदेशात लोकसंख्या जास्त आहे. ३) उत्तर भारतीय मैदानात हावरा ते अमृतसर दरम्यानच्या क्षेत्रात लोहमार्गांचे दाट जाळे आहे. ४) शेती उत्पादनाप्रमाणेच येथे खनिजांची उपलब्धता, उद्योगांची वाढ यामुळे या मैदानात लोहमार्गांचे जाळे दाट आहे.

२) १) ब्राझीलमध्ये वन्य प्राण्यांची बेकायदेशीर केली जात आहे. २) स्थलांतरित शेती केल्यामुळे जंगलतोड केली जात आहे. ३) त्यामुळे प्राण्यांचे निवास्थान कमी होत आहे. त्याचबरोबर प्रदूषण खूप मोठ्या प्रमाणात होत आहे. ४) अशा या समस्यांमुळे स्थानिक वन्य प्राण्यांच्या प्रजाती नष्ट होत आहेत. ५) त्यासाठी राष्ट्रीय उद्यानांची व अभयारण्याची गरज निर्माण झाली आहे. म्हणून भारताप्रमाणे ब्राझीलमध्येही प्राणी व वनसंवर्धनाची गरज आहे.

३) १) भारत व ब्राझील देशाचा भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास ब्राझीलचे क्षेत्रफळ हे भारताच्या क्षेत्रफळाच्या तिप्पट आहे. २) भारतात कृषी सेवा हा प्रमुख व्यवसाय आहे. ३) ब्राझीलमध्ये सेवा व्यवसायाचे प्रमाण सर्वाधिक आहे. ४) ब्राझीलपेक्षा भारतात सेवा व्यवसायाचे प्रमाण त्यामानाने कमी आहे. म्हणून ब्राझीलमधील दरडोई जमीन धारणा भारताच्या तुलनेत जास्त आहे.

४) १) युरोपमधून आलेल्या वसाहतवाद्यांनी ब्राझीलमध्ये सुरवातीच्या वस्त्या निर्माण केल्या. २) या वस्त्या ब्राझीलचा किनारी प्रदेशात निर्माण झाल्या असून ब्राझीलमधील किनारपट्टीचे हवामान सम व दमट आहे. ३) येथे मुबलक जमीन जरी कमी असली तरीही दाट वस्ती आढळते. म्हणून ब्राझीलमध्ये लोकवस्तीचे केंद्रीकरण वाढत आहे.

**प्र.६ अ) दिलेल्या माहितीच्या आधारे रेषालेख तयार करा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**




१) २००१ ते २०११ या दशकात नागरीकरण सर्वाधिक होते.

२) १९६१ ते ९१७१ या दशकात नागरीकरणाची वाढ अतिशय कमी होती?

३) रेषालेखाचा कल पाहता सुरवातीच्या काळात नागरीकरणाचा वेग कमी होता. १९८१ नंतरच्या काळात भारतात नागरीकरणाचा वेग वाढलेला दिसतो.

**किंवा –** दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) वरील आलेख भारत आणि ब्राझीलचे लिंग गुणोत्तर दर्शवतात.
२) एखाद्या प्रदेशातील दर हजारी पुरूषांचा तुलनेत असलेली स्त्रियांची संख्या म्हणजे लिंगगुणोत्तर होय.
३) ब्राझील देशाचे लिंग गुणोत्तर जास्त आहे.
४) ब्राझीलमध्ये २००१ सालापासून स्त्रियांच्या संख्येत लक्षणीय वाट झाली आहे.
५) भारत देशात पुरूषांची संख्या स्त्रियांपेक्षा अधिक आहे.
६) भारतात १९९१ नंतर लिंगगुणोत्तरात थोडी वाढ झाली आहे.

**प्र.७ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) ब्राझिलमधील संदेशवहन – १) ब्राझीलमध्ये चार काल विभाग आहेत. २) ब्राझीलमध्ये पूर्व व पश्चिममध्ये ३ तासांचा फरक आहे. ३) ब्राझीलमध्ये दक्षिण मध्य भागात दूरसंचार सेवेच्या पायाभूत सुविधा अतिशय आधुनिक आहेत. ४) अवकाशतंत्राच्या बाबतीत ब्राझील स्वदेशी तंत्रज्ञानाचा विकास करून उपग्रह अवकाशात सोडण्याच्या तयारीत आहे. ५) ब्राझीलमध्ये ४५% पेक्षा अधिक लोकसंख्या इंटरनेटचा वापर करत आहे. ६) ब्राझीलमध्ये 'ब्राझीलियन अवकाश एजन्सी'च्या वतीने देशाच्या अवकाश संशोधनाचा कार्यक्रम राबवला जातो.

भारतातील संदेशवहन – १) भारतात एकच काल विभाग आहे. २) भारतामध्ये पूर्व व पश्चिममध्ये २ तासांचा फरक आहे. ३) भारतात दूरसंचार सेवा महत्त्वाच्या शहरांत विकसित झाली आहे. ४) अवकाश तंत्राच्या बाबतीत भारत विकसित आहे आणि उपग्रह अवकाशात सोडले आहेत. ५) भारत हा सर्वाधिक स्मार्ट फोन व इंटरनेट वापरणा-यांचा देश बनला आहे. ६) इस्त्रो(ISRO) या भारतीय अवकाश संशोधन संस्थेमार्फत भारतातील अवकाश संशोधनासंबंधीचे उपक्रम राबवले जातात.

२) १) भारताला काही नैसर्गिक आपत्तींना द्यावे लागते. उदा. अतिवृष्टी, पूर, अनिमित पाऊस, वादळे इत्यादी. २) सदाहरित वनांमुळे ब्राझीलमध्ये ऑक्सिजनचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. ३) परंतु वाढती लोकसंख्या, स्थलांतरित शेती, प्रदूषण यांमुळे अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण होतात.

३) १) ब्राझीलचा पश्चिमी भाग ॲमेझॉन नदीच्या विस्तीर्ण दुर्गम खोऱ्याने विस्तृतपणे व्यापलेला आहे. २) ब्राझीलच्या पूर्वीय भागात प्रामुख्याने मँगनीज, निकेल, तांबे, बॉक्साईट इत्यादी खनिजांचे साठे आढळतात. ३) परंतु ब्राझीलचा पश्चिमी भाग मानवी वस्तींसाठी प्रतिकूल आहे. ४) कारण या भागात विस्तीर्ण, घनदाट, दुर्गम अशा वनांनी आच्छादलेल्या ॲमेझॉनच्या खोऱ्यात पायाभूत सुविधांचा अभाव तसेच खनिज साठ्यांसंबंधीचे अ ज्ञान आहे. ५) परिणामी, ब्राझीलच्या पश्चिम भागात खाणकाम व्यवसायाचा विकास अल्प झालेला आहे.